**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

# प्रेस नोट

**दिनांक १२/०७/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. देवलापार :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा गुल्लन धाबा समोर बोथीयाॅ पालोरा शिवार बस स्टॉप येथे दिनांक ०९/०७/२०२२ चे २१.०० वा. ते २२.०० वा. सुमारास **वासुदेव मोहन लांजेवार (मृतक), वय ५७ वर्ष, रा. सराखा बोर्डा** हा जास्त प्रमानात दारू पिउन गुल्लन धाब्याजवळ बस स्टॉप जवळ झोपुन राहीला आणि तेथेच बेशुध्द झाला. त्याला बेशुध्द अवस्थेत ग्रामीण रूग्णालय देवलापार येथे भरती केले असता तेथील डॉक्टरांनी प्रथोमपोचार करून मेयो हॉस्पीटल नागपुर येथे रेफर केले. तिथे उपचार सुरू असतांना डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी पोलिस हवालदार प्रदीप ठाकुर मेयो पोलिस बुथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार राकेश नलगुडंवार मो.नं. ९९२३७०१६९७ हे करीत आहे.

२) पो.स्टे. बुटीबोरी :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा घोडेघाट शिवार येथे दिनांक ११/०७/२०२२ चे ०८.०० वा. पुर्वी फिर्यादी नामे— शंकर रामदास सोमनकर, वय ४० वर्ष, रा. घोडेघाट शिवार ता. हिंगणा जि. नागपूर हे आपल्या शेतावर जात असतांना शेताचे बाजुला एक अनोळखी इसम वय ५० ते ५५ वर्ष पडून दिसला. त्याचे अंगात पांढऱ्या व निळया रंगाचे लोअर घातलेले होते व तो चित अवस्थेत होते. शरीराची कोणतीही हालचाल नव्हती. फिर्यादी यांनी सदरची माहिती ग्रामपंचायत संदस्यांना दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार असलम नौरंगाबादे मो.क्र. ८६६८८१६०४९ हे करीत आहे.

३) पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील पाणउबाडी बसस्थानक जवळ सावनेर येथे दिनांक ०७/०७/२०२२ चे १८.०० वा. पुर्वी **रतन मारोती मंजूळकर (मृतक), वय २२ वर्ष रा. पाणउबाडी बसस्थानक जवळ सावनेर** याने घरगुती कारणावरुन किटक नाशक विषारी औषध सेवन केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचाराकामी प्रथम ग्रामीण रुग्णालय सावनेर व नंतर मेयो हॉस्पीटल नागपूर येथे नेले असता दि. १०/०७/२०२२ चे १६.३० वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. पोस्टे. सावनेर ला कागदपत्रे प्राप्त झाल्यावरुन सदर मर्ग दाखल करुन चौकशीत घेतला

सदर प्रकरणी पोलिस हवालदार नदीर कुरेशी मेयो पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार देवशंकर गुप्ता हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर